

# प्रिंट टू प्रॉफिट


**विनय कळसकर**
चिटणीस, शिक्षण समिती
मोबाईल : ९८२२०३६०३५


दि. २५ फेब्रुवारी २०२२ रोजी, आदल्या दिवशी साजरा होणारा जागतिक मुद्रण दिनाचे औचित्य साधून PPOA ने शिक्षण समितीने 'Print to Profit' या कार्यक्रमाचे आयोजन केले.

मागील दोन ते अडीच वर्षे कोरोना या रोगाने जगात सर्वत्र थैमान घातले होते. आपण शारीरिकरीत्या भयभीत होतोच शिवाय मानसिक खच्चीकरण झाले ते वेगळेच. आपण सर्वांनी या दरम्यान व्यवसायात खूप चढ-उतार अनुभवले, नफा तर सोडाच व्यवसाय करू शकू का नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु हळूहळू यात बदल दिसू लागलाय, लवकरच सर्व पूर्व पदावर येईल अशी आशा निर्माण होतेय.

आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा नफा हाच विषय केंद्रस्थानी ठेवून 'Print to Profit' चे आयोजन केले.

सभासदांना एकत्रित येण्यासाठी Whatapp Group द्वारे व फोन कॉल करून आवाहन करण्यात आले. यासाठी आपण नफा कमवणारे मुद्रक आहात का? ग्राहक आणि विक्रेता यामध्ये मुद्रकाचे सँडविच होत आहे का? नाहीसा होणारा नफा ही जादू तर नाही ना? आपण हत्तीला कधी सुईमधून जाताना पाहिलंय? नफा हा सुईतूनही निसटू शकतो. नफा हा पाण्यासारखा असून मिळेल त्या सोप्या वाटेने वाहत जातो तर काही सेकंदात त्याची वाफदेखील होते. नफा गळती रोखण्यासाठी अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते का? अशा एक ना अनेक प्रश्नांचा भडिमार करीत या प्रश्नांची उकल या आयोजित केलेल्या चर्चासत्रात मिळेल. या आशेने आपण सर्वजण उपस्थित राहिलात आपणां सर्वांचे शिक्षण समिती तर्फे स्वागत!

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. प्रदीप कुलक्कडा आणि श्री. जोस थॉमस यांनी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन व मुद्रकजनक योहान्स गुटेनबर्ग यांच्या प्रतिमेचे व सरस्वतीचे पूजन केले.











## पाहुण्यांचा परिचय

**Future Schoolz :**
- **Finishing School & Consulting company for printing, packaging & Allied Industries**
- **Member of International standardization Bodies & Associations**
- **Honorary Member**



### Kulakkada Pradeep
**Future Schoolz CEO**
**G7 Certified Expert**

- Expertise in Colour Profiling and Colour Standardisation
- Printing Technologist with 28+ years of experience
- Print educator, skilling specialist and print consultant
- Practical experience in print supervision, production management, pre-press & colour management, security printing
- Technical Committee Member, AIFMP
- Curriculum committee Member, ASAP – World bank project by Kerala Govt.
- Editorial Member, Print Miracle, Kerala Master Printers Association
- Visited plants of Komori, Ryobi, Heidelberg, Horizon
- Quality Control, Print Standardisation, Colour Management & Profiling
- Implemented processes - SOP and checklists for production and store
- Industry understanding and wide network among print stakeholders



### Jose Thomas
**Principal Consultant**

- Printing Technologist with 25+ years of experience
- Started career with Crossfield Drum Scanner and Scitex technologies
- Experience in leading pre-press and pre-media houses – Comart, Express Colour Scan, Better Communications etc
- Lead pre-press house and made it to a mainstream print house in Kerala
- Director and marketing head of a software company for 10 years
- Lead development & marketing of workflow management software
- Sold and implemented at Coca-Cola, SABMiller, Lowe Lintas (IPG Group), Star TV (21st Century Fox), Kotak Mahindra Group, Campden BRI, UK
- Business Head of Quotient Communication – an independent Ad agency serving Coca-Cola brands, Croma, Reliance Retail, Pidilite, Marico, Abbott











- प्रेसमध्ये Shift किती वाजता सुरू होते?
- त्यानंतर किती वेळामध्ये Actual Production सुरू होते?
- एका Shift मध्ये किती तास Actual Production प्राप्त होते?
- आपल्याकडे Job Wastage चे प्रमाण किती टक्के आहे?
- आपणाकडे असणाऱ्या मशिनरीतील ॲटोमॅटीक फंक्शनचा वापर जास्तीत जास्त होतो का? त्यावरील नियंत्रण कसे ठेवता?
- आपणाकडे असणाऱ्या यंत्रसामग्रीची देखभाल आपण नियमित करता का?
- प्रिंटिंगपूर्वी प्लेट्स वापरताना, आपण छापत असणारे Design हे कोणत्या Format मध्ये असते. JPG का PDF? आपल्याकडे वापरले जाणारे शाईचे डबे कशा रीतीने ठेवले जातात?
- लॅमिनेशन Film रोल आपण कशा रीतीने ठेवता?
- आपणास आपल्याकडील Basic Hourly Rate (BHR) प्रत्येक मशिनचा आणि होत असलेल्या वापराचा ठाऊक आहे का?

  BHR कमी कसा केला जाऊ शकतो.

  BHR कसा मोजला जातो.

  BHR महत्त्वाचा का आहे.
- एखादा Job पूर्ण झाल्यावर तुम्ही Job Costing करून पाहता का?
- आपण पुरेसा नफा कमावता का?
- आपण कमवत असलेला नफा नेमका कुठे जातो याचा दूरवर विचार कधी केलात का?









- आपल्याला लागणारा कच्चा माल उदा. पेपर, शाई, केमिकल, बाईंडिंग मटेरिअल या सर्वांचे दर वाढत असताना, प्रिंटिंगचे दर कमी होताना दिसतात. हे कशाचे लक्षण आहे.
- या परिस्थितीत आपण रडत बसणार का? की, धैर्याने, ताकदीनिशी यास सामोरे जाणार?
- नफ्याशिवाय व्यवसाय करणे हे घातकच आहे. नेमका आपला नफा कोणी चोरत तर नाही ना? उत्पादन, भांडवल, व्यवस्थापन याच महत्त्वाच्या गोष्टीतील कमतरता नफा कमी करत नसतील ना?
- उत्पादन, भांडवल, व्यवस्थापन याच महत्त्वाच्या गोष्टीतील कमतरता आपला नफा कमी करत नसतील ना?
- उत्पादन करताना याखालील महत्त्वाच्या विशेष गोष्टी लक्षात ठेवून सांभळायला हव्यात.
  - मशिनचा वेग
  - किती तास काम करता
  - अनुभवी कामगार
  - किती कामगार काम करतात
  - मशिनरी नवी आहे का?
  - आपल्याकडे पुरेशी जागा आहे का?
  - ॲटोमायजेशन किती आहे?
  - प्रेस मालक जातीने लक्ष देतो का?
  - उत्पादन क्षमता पुरेशा बिलांएवढी होते ना?

खरेतर कमीत कमी वेळात, शून्य नुकसान होऊन, कमीत कमी दरात आणि समाधानकारक क्वालिटी मिळणे, हेच खरे उत्पादन ठरेल.

हल्ली सर्व बँकिंग, विमा क्षेत्रात KYC (Know Your Customer) जसे प्रचलित व आवश्यक आहे तसे आपल्या व्यवसायात KYP (Know Your Production) Also Know Your Production Capacity हे माहीत असणे गरजेचे आहे.

### Infrastructure :

यंत्र सामग्रीची देखभाल वेळच्यावेळी घेऊन सुस्थित असणे म्हणजेच आपल्या प्रेसचे सर्वकाही नेटके आहे असे म्हणता येईल.

आपल्याकडे प्रेसमध्ये काम चालू असताना, डिझायनिंग, CTP Unit, प्रेस कामगार आणि Finishing करताना बाईंडिंगचे कामगार या सर्वांमध्ये ताळमेळ असावा, एकमेकांना कामाबद्दल पुरेसा संवाद असावा जेणेकरून उत्पादन कमी वेळेत योग्य त्या क्वालिटीमध्ये तयार होईल.

### तांत्रिक सुविधेचा वापर

मशिनवर काम करणारा कामगार, तांत्रिक बाबी माहीत असणारा अनुभवी असावा. एखाद्या छोट्या गोष्टीकडे दुर्लक्ष झाल्याने नफा कमी होऊ शकतो. बऱ्याच प्रेसमधील Activity Manually काम करून होतात. तर काही कामगार पुरेसे अनुभवी नसतात. तांत्रिक गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यास Rejection होण्याची दाट शक्यता असते, ज्यामुळे पुढे जाऊन नुकसान होते.

### Materials :

शाईचा वापर मशिनमध्ये करताना, कशा प्रकारे होतो. शाई घेताना व वापरून परत डब्यात ठेवताना, मशिन साफ करताना कशी व किती काळजी घेतली जाते. केमिकल्स वापरताना कंपनीने सुचविल्याप्रमाणे योग्य त्या प्रमाणात घेतो का? प्रमाण चुकत तर नाही ना? या गोष्टींकडे विशेष लक्ष द्यायला हवे.

### भांडवल :

Costing हा सर्वांत मोठा व्यवसायाचा भाग असून, आपणांस किती Profit मिळायला हवा, याचा विचार त्या त्या कामाचे Estimate करताना जसा BHR (Basic Hourly Rate) वरून करता येतो.

आपणाकडील काम पूर्ण झाल्यानंतर ग्राहकाला आपण Bill वेळेत देतो का? जेवढा Bill देण्यास उशीर तेवढा आपला तोटाच असतो. चांगला नफा मिळविण्यासाठी बिल वेळेत जाणे व वेळेवर मिळणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.